# संचार

sanchar@gmail.com • सोलापूर • रविवार, १३ मार्च २०२२ www.esanchar



## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

उप प्रादेशिक कार्यालय, सोलापूर. दूरध्वनी क्र. ०२१७-२३१९८५०.

**Visit us at : http://mpcb.gov.in Email : srosolapur@mpcb.gov.in**

ब/४, बाळी बिल्डिंग, सिव्हिल लाईन्स, शासकीय दूध डेअरीसमोर, सात रस्ता, सोलापूर-४१३००३


# पर्यावरणविषयक जाहीर सुनावणीबाबत सूचना

जिल्हा खनिकर्म अधिकारी, गौण खनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांचे पत्र दि.०७/०१/२०२२ अन्वये सोलापूर जिल्ह्यातील भीमा नदीवरील दक्षिण सोलापूर, पंढरपूर, अक्कलकोट तालुक्यातील खालील वाळूस्थळ साठ्याच्या जाहीर लिलावासाठी पर्यावरणविषयक अनुमती प्राप्त करून घेण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे प्राप्त झालेला आहे.

| अ. क्र. | नदी | वाळू स्थळ साठा | तालुका | जिल्हा | गट नं. | क्षेत्रफळ (हेक्टर) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भीमा | भंडारकवठे | दक्षिण सोलापूर | सोलापूर | ८२९, ७९१ ते ७९७ | ४.२० |
| २ | भीमा | चळे | पंढरपूर | सोलापूर | ३९९, ४०१/१, ४०१/१/२/१, ४०१/२/२, ४०२, ४१०, ४१३, ४१४/२ब, ४१४/१ | ४.५० |
| ३ | भीमा | खानापूर | अक्कलकोट | सोलापूर | २२५ ते २३४, २३५ ते २४०, २४३, २५९ | ४.५० |

या प्रस्तावासंबंधी प्रकल्पाच्या संभाव्य प्रकल्प पीडित नागरिक/ शेतकरी/ पर्यावरणाविषयी काम करणाऱ्या संस्था यांच्याकडून पर्यावरणविषयक सूचना, विचार, टीका-टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी पर्यावरणविषयक जाहीर सुनावणीचे आयोजन करण्यात येत आहे. केंद्रीय पर्यावरण व वने व वातावरणीय बदल मंत्रालय यांनी जारी केलेल्या आदेशान्वये पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीसाठी १०० लोकांना परवानगी दिली असून तोंडाला मास्क लावणे, थर्मल स्कॅनिंग करणे, सामाजिक अंतर ठेवणे, हॅन्डवॉश व सॅनिटायझरचा वापर करणे बंधनकारक आहे.

**सुनावणीचे ठिकाण : जिल्हा नियोजन भवन, सात रस्ता, सोलापूर.**

**सुनावणीची तारीख : बुधवार, दिनांक १३/०४/२०२२. सुनावणीची वेळ : सकाळी ११.४५ वाजता.**

सदर विस्तारीकरण प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवासी, पर्यावरणाविषयी काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित किंवा प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना जाहीर सुनावणीमध्ये सहभाग घेता येईल. केंद्रीय पर्यावरण व वने व वातावरणीय बदल मंत्रालय यांनी जारी केलेल्या आदेशान्वये प्रस्तावित प्रकल्पासंबंधी सूचना, मत, टीका-टिप्पणी किंवा आक्षेप, तोंडी किंवा लेखी स्वरुपात नोंदविता येतील.

सदर प्रकल्पासंबंधीचा संक्षिप्त अहवाल, पर्यावरणीय आघात मूल्यांकन अहवाल इत्यादीसंबंधी माहिती असलेले दस्तऐवज खालील कार्यालयामध्ये उपलब्ध असून संबंधित व्यक्ती या कार्यालयामध्ये जाऊन सदर कागदपत्रे अभ्यासू शकतील.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर.
२. जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
२. मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, सोलापूर
३. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर
४. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय) कल्पतरु पॉईंट, ३ रा व ४ था मजला, सायन माटुंगा, स्किम रोड क्र. ८, सायन सर्कलसमोर, सायन (पूर्व), मुंबई-४०००२२
५. प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, जोग सेंटर, ३ रा मजला, वाकडेवाडी, जुना पुणे-मुंबई रोड, पुणे-४११००३.
६. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासकीय भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
७. उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर.
८. प्रांतअधिकारी/ उपविभागीय अधिकारी, १ व क्रमांक २, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
९. प्रांतअधिकारी/ उपविभागीय अधिकारी, पंढरपूर
१०. उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
११. तहसीलदार, तहसील कार्यालय, दक्षिण सोलापूर, ता. दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर.
१२. तहसीलदार, तहसील कार्यालय, पंढरपूर, ता. पंढरपूर, जिल्हा सोलापूर.
१३. तहसीलदार, तहसील कार्यालय, अक्कलकोट, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
१४. गटविकास अधिकारी, पंचायत समिती दक्षिण सोलापूर, ता. दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर.
१५. गटविकास अधिकारी, पंचायत समिती पंढरपूर, ता. पंढरपूर, जिल्हा सोलापूर.
१६. गटविकास अधिकारी, पंचायत समिती अक्कलकोट, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर.
१५. ग्रामसेवक/ सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, मौजे भंडारकवठे, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर.
१६. ग्रामसेवक/ ग्रामपंचायत कार्यालय, चळे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर.
१७. ग्रामसेवक/ ग्रामपंचायत कार्यालय, खानापूर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर.

प्रस्तावित प्रकल्पासंबंधी काही सूचना, मत, टीका-टिप्पणी किंवा आक्षेप असल्यास उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ सोलापूर, ब/४, बाळी बिल्डिंग, सिव्हिल लाईन्स, शासकीय दूध डेअरीसमोर, सात रस्ता, सोलापूर-४१३००३ या कार्यालयास दिनांक : १३/०४/२०२२ पर्यंत किंवा त्यापूर्वी लेखी स्वरुपात नोंदविता येतील.

सही/-

**उप प्रादेशिक अधिकारी,**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर